# Marathi XII (109) 2022-23

## मराठी: (१०९) : अकरावी-बारावी 2022-23

❖ प्रस्तुत अभ्यासक्रमाची उद्दिष्ट्ये :

सर्वांगीण विकास' हे शिक्षणाचे मुख्य सूत्र आहे आणि 'भाषा शिक्षण' या शिक्षण प्रणालीचा आधारभूत कणा आहे, कारण जीवन आणि भाषा यांचा असलेला अतूट संबंध नाकारता येत नाही. शाश्वत जीवन मूल्ये आणि सांस्कृतिक, सामाजिक, व्यावसायिक, अशा वेगवेगळ्या क्षेत्रातील विविध मूल्ये व कौशल्ये रुजवणे केवळ भाषेमुळेच शक्य होते.

मराठी वा अन्य माध्यमातील विद्यार्थी निम्न माध्यमिक स्तर म्हणजे इयत्ता १० वीपर्यंत शिक्षण पूर्ण करतात तेव्हा मराठी वाचणे, ऐकणे, लिहणे, समजून घेणे, आपले मत / विचार व्यक्त करणे अशा सामान्य क्षमता मिळवतो. उच्च माध्यमिक स्तरावर [ ११ वी, १२ वी] या क्षमतांचाही स्तर उंचावणे अपेक्षित आहे. या टप्प्यावर विद्यार्थी 'उदर निर्वाहाची साधन-निश्चिती व त्यासाठी पुढील उच्च शिक्षणाची तयारी' यासाठी स्वतःला तयार करत असतो.

यानुसार या पाठ्यक्रमातून मराठी साहित्यातील कथा, कविता, लेख यासोबतच व्यक्तिचित्र, विनोदी साहित्य, नाटक, प्रस्तावना लेखन अशा साहित्य प्रकारांची ओळख होऊन मराठी भाषेची, मराठी साहित्याची जाण समृद्ध होईल. शाश्वत नैतिक मूल्यांची जाणीव सखोल होईल, सुजाण नागरिकत्व, पर्यावरण मैत्री अशा मूल्यांचीही जाण विकसित होईल.' व्यक्त करणे / अभिव्यक्त होणे' ही या काळच्या नव्या पिढीची आवड आणि गरज आहे. यासाठी वेगवेगळी भाषिक कौशल्ये रुजवली जातील. मागील वारशाची ओळख आणि विज्ञान, नवे तंत्रज्ञान याची सांगड घातली जाऊन व्यवहारात व नव्या युगातील व्यावसायिक, सामाजिक, सांस्कृतिक ..... अशा विविध क्षेत्रात भाषेचा सुयोग्य उपयोग करता यावा यासाठी भाषिक क्षमता विकसित होतील आणि विद्यार्थी नव्या युगाची आव्हाने पेलण्यास सक्षम होईल.

**उद्दिष्ट्ये:**

मराठी भाषेतील / मराठी भाषेत .........

- आतापर्यंत प्राप्त केलेल्या भाषिक क्षमतांचा स्तर वाढवणे.
- दृक् व श्राव्य माध्यमातून मिळणाऱ्या सूचना, जाहिराती, निवेदने, बातम्या, चर्चा, परिसंवाद इत्यादीतील विचार / कल्पना समजणे.
- नाटक, काव्य अशा साहित्याचे अभिवचन करता येणे.
- विविध साहित्य प्रकारांचा आस्वाद घेणे.
- वाचनातून समीक्षणात्मक दृष्टीकोन निर्माण होणे व तो जोपासला जाणे.
- एखाद्या विषयाला अनुसरून स्वतःचे विचार, मत सुसूत्रपणे, संदर्भासह मांडता येणे. व्यक्त होता येणे.
- जनसंचार माध्यमांसाठी आवश्यक अशी भाषिक कौशल्ये आत्मसात करून उपयोग करता येणे. जसे : कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, रेडीओ निवेदन इ.
- नव्या युगातील नव्या माध्यामतून – प्रिंट व इलेक्ट्रानिक माध्यम – मराठी भाषेचा सुयोग्य वापर करता येणे.
- अनुभव, निरीक्षण आणि त्यावरील आपले विचार, लिखित रुपात व्यक्त करणे.
- अनुवाद कौशल्य मिळवणे.
- भाषेचा व्याकरण व लेखन नियमानुसार अचूक वापर करता येणे.
- भाषा सौंदर्याची जाण विकसित होऊन लालित्यपूर्ण सुंदर भाषेचा उपयोग करता येणे.

*****************

**Curriculum : Marathi (109);** Class XII : **2022-23**

# अभ्यासक्रम : मराठी (**109**) इयत्ता : बारावी **2022 – 23**

अभ्यासक्रमाबाबत महत्त्वाचे :

- प्रश्नपत्रिकेचे स्वरूप – प्रश्नपत्रिका 'अ' आणि 'ब' अशा दोन विभागात असेल.
- 'अ' विभाग **40** गुण **;** सर्व वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी [ **MCQ]** प्रश्न. अंतर्गत पर्यायासह
- 'ब' विभाग **40** गुण **;** विस्तारात्मक उत्तरासाठी प्रश्न. [यात लघुत्तरी, विस्तारात्मक, स्पष्टीकरणात्मक, निबंध .. इ. प्रश्न ] अंतर्गत पर्यायासह.
- पाठ्यपुस्तकातील काही घटक/ पाठ वगळण्यात आले आहेत. तासिकांची संख्या ही कमी केली गेली आहे. पाठ्यपुस्तकातील –'लेखन' आणि 'उपयोजित मराठी' हे विभाग प्रश्नोत्तरासाठी नाहीत ; तथापि लेखन - कौशल्य आणि अंतर्गत मूल्यमापन यासाठी ते महत्त्वाचे आहेत. विद्यार्थ्यांनी या घटकांचा 'स्व-अभ्यास' करणे अपेक्षित आहे.

**पाठ्यक्रम :**

| | **लेखन व व्याकरण** (Writing Skills and Grammar) | |
|---|---|---|
| अनुक्रम | पाठक्रम | घटक |
| 1 . | 1. | निबंधलेखन *[वाचन व स्व-अभ्यास]* |
| 2 . | 2. | सर्जनशील लेखन *[वाचन व स्व-अभ्यास]* |
| 3. | 3. | व्याकरण |
| | **विनोद : एक साहित्यप्रकार Joke : A type of Literature** | |
| अनुक्रम | पाठक्रम | पाठाचे / कवितेचे नाव |
| 4 | अ) | विनोद :एक वाङ्गम्य प्रकार **[ केवळ वाचन ]** |
| 5 | ब) | भुताचा जन्म |
| 6. | क) | दहावीची (अ)पूर्व तयारी |
| **गद्य विभाग Prose Section** | | |
| 7. | 4. | ..... आणि कैदेत |
| 8. | 5. | अति काळजीचे परिणाम |
| 9 . | 6. | सोयरा वृक्षवल्लीचा |
| **पद्य विभाग Poetry section** | | |
| 10. | | संतवाणी : क) अभक्ताची ओळख |
| 11 . | 3. | देव अजब गारुडी |
| 12 | 5 | या जन्माला फुटे न भाषा |

| | | |
|---|---|---|
| 13. | 6 | खांब |
| 14. | 8 | बहरतील मळे |
| | **उपयोजित मराठी Upayojit Marathi** | |
| 15. | 1. | लेख – अग्रलेख |
| 16. | 4 | मुलाखत |
| 17. | 5 | संगणक |

मराठी युवकभारती : इयत्ता बारावी [2013] Std – XII – 'YuvakBharti' (2013) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळ, पुणे.
Maharashtra State Board Of Secondary And Higher Secondary Education, Pune

## प्रश्नपत्रिका प्रारूप : बारावी

Question-paper Format : for Std. XII

<u>अभ्यासक्रमाबाबत महत्त्वाचे</u> :

- ❖ प्रश्नपत्रिकेचे स्वरूप – प्रश्नपत्रिका 'अ' आणि 'ब' अशा दोन विभागात असेल.
- ❖ 'अ' विभाग **40** गुण **;** सर्व वस्तुनिष्ठ**,** बहुपर्यायी [ **MCQ]** प्रश्न. अंतर्गत पर्यायासह
- ❖ 'ब' विभाग **40** गुण **;** विस्तारात्मक उत्तरासाठी प्रश्न. [यात लघुत्तरी**,** विस्तारात्मक**,** स्पष्टीकरणात्मक**,** निबंध .. इ. प्रश्न ] अंतर्गत पर्यायासह.
- ❖ पाठ्यपुस्तकातील काही घटक/ पाठ वगळण्यात आले आहेत. तासिकांची संख्या ही कमी केली गेली आहे. पाठ्यपुस्तकातील –<u>'लेखन' आणि 'उपयोजित मराठी' हे विभाग प्रश्नोत्तरासाठी नाहीत **;**</u> <u>तथापि लेखन - कौशल्य आणि अंतर्गत मूल्यमापन यासाठी ते महत्त्वाचे</u> आहेत. विद्यार्थ्यांनी या घटकांचा 'स्व-अभ्यास' करणे अपेक्षित आहे.

### **विभाग अ : गुण** 40

| **घटक**<br>**Unit** | **उपघटक आणि विवरण**<br>**Sub-unit & description** | **प्रश्न प्रकार**<br>**Type of Question** | **प्रतिप्रश्न गुण व एकूण गुण**<br>**Total Marks** |
|---|---|---|---|
| आकलन<br>अपठीत गद्य | दोन अपठीत गद्यांश [ अंदाजे 200 / 250 शब्द ] या 2 पैकी एका परीच्छेदांवर उत्तरे लिहिणे. | बहुपर्यायी ;<br>सात पैकी सहांची उत्तरे | १ x 6 = 6 |
| अपठीत पद्य | दोन पद्यांश, त्यापैकी एका पद्यांशावरील उत्तरे | बहुपर्यायी;<br>सातपैकी सहांची उत्तरे | १ x 6 = 6 |
| व्याकरण | 1].वाक्याचा प्रकार 2] वाक्याचा प्रयोग 3]काळ 4] शब्दजाती 5] वाक्प्रचार<br>या व्याकरण घटकांवर आकलन, परिवर्तन, व वापर / उपयोग [based on knowledge / identification, application, evaluation ] यावर आधारित प्रश्न. | बहुपर्यायी प्रश्न<br>प्रत्येक घटकावर <u>चारपैकी तीन</u> प्रश्नांची उत्तरे ; 5 वा घटक <u>'वाक्प्रचार' 6 पैकी 4</u> | 1 x 16 = 16 |
| पाठ्यपुस्तक<br>गद्यपाठ | पठित गद्यांश [ अंदाजे 80 / 100 शब्द.] त्या आधारे पूर्ण पाठाशी संबंधित प्रश्न. | बहुपर्यायी<br>सातपैकी सहाची उत्तरे | 1 x 6 = 6 |
| पद्यपाठ | पठित पद्यांश [ अंदाजे 70 / 80 शब्द] | बहुपर्यायी सातपैकी सहाची उत्तरे | 1 x 6 – 6 |

### **विभाग ब : गुण 40**

| **घटक**<br>**Unit** | **उपघटक आणि विवरण**<br>**Sub-unit & description** | **प्रश्न प्रकार**<br>**Type of Question** | **प्रतिप्रश्न गुण व एकूण गुण**<br>**Total Marks** |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| साहित्य<br>गद्य – पद्य पाठ | गद्य पद्य पाठधारे [सुमारे 25 /30 शब्दांत उत्तरांसाठी] | लघुत्तरी<br>आठपैकी पाच प्रश्नांची उत्तरे | 2 x 5 = 10 |
| | गद्य पद्य पाठधारे सुमारे 60 /70 शब्दांत उत्तरांसाठी प्रश्न | विस्तारात्मक उत्तरे<br>आठपैकी पाच प्रश्नांची | 3 x 5 = 15 |
| लेखन | **i)**निबंध लेखन [ कल्पनारम्य/ चिंतनात्मक/ **/**सामाजिक विषयावर] | विस्तारात्मक उत्तर<br>**[250 / 300** शब्द ]<br>चारपैकी एक | 1 x 10 = 10 |
| उपयोजित लेखन | उपयोजित लेखन<br>क) वृत्त/बातमी लेखन **किंवा**<br>ख) संवाद **–** लेखन | लघुउत्तरी<br>**[**अंदाजे **70 /75** शब्द]<br>दोनपैकी एक | 1 x 5 = 5 |

***********

REDUCTION OF SYLLABUS FOR ASSAMESE- (CODE114)
**Class XII** 2020-2021
(September 2020 – March 2021)

**Language: Assamese (114)     Class: XII**

| Unit Name | Reduction in Syllabus/Changes | Number of periods reduced | Rationale/Justification |
|---|---|---|---|
| Grammar<br>Baak Sanghati<br>Sandhi<br>Samochcharan Sabda<br>Linga<br>Biparitarthak Sabda | Deleted from the syllabus | 30 | Reduced as per CBSE directives due to COVID-19 |
| Prose<br>Maganiyar | Deleted from the syllabus | 15 | -do- |
| Poetry<br>Biswa Khanikar | Deleted from the syllabus | 15 | -do- |